TKN/KS/16/1104

**Bachelor of Arts (B.A.) Part-II Examination**

**COMPULSORY MARATHI**

आवश्यक मराठी

**(Other Language)**

**(New Course)**

वेळ—तीन तास] [एकूण गुण—100

1. 'सर्व प्रकारचे दुर्गुण स्त्रियांचे च अंगी असतात' या समजुतीचे खंडण ताराबाई शिंदे ह्यांनी कशाप्रकारे केलेले आहे ? 10

किंवा

'शिक्षक हाच राष्ट्राचा भाग्यविधाता' आहे असे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज का म्हणतात ?

2. मोरोपंतांनी आपल्या केकावलीतून सत्संगतीचा महिमा कशाप्रकारे वर्णन केलेला आहे ? 10

किंवा

'एका नव्या संघर्षात' या कवितेतून समाजातील वास्तवाचे दर्शन कवीने कशाप्रकारे घडविलेले आहे ?



3. पुढीलपैकी कोणत्याही **एकाच गटातील** प्रश्नांची उत्तरे लिहा : 20

गट 'अ'

(क) रुंभणेयाच्या दृष्टांतातून केशीराजबासांनी मनुष्याला कोणता उपदेश केलेला आहे ?

(ख) यशस्वी वक्ता म्हणून आचार्य अत्रे ह्यांची जडणघडण कशाप्रकारे झालेली आहे ?

(ग) संत नामदेवांनी नामस्मरणाचे महत्व कसे प्रकट केले ?

(घ) शेतकऱ्यांच्या दुर्दैवी जीवनाचे चित्रण कवी यशवंत यांनी कशाप्रकारे केलेले आहे ?

किंवा

गट 'ब'

(च) पं. महादेवशास्त्री जोशी यांनी पंढरपुरातील स्थानांचे वर्णन कशाप्रकारे केलेले आहे ?

(छ) बा.ह. कल्याणकर ह्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अस्पृश्य समाजाच्या क्रांतीचं तुफान असे का म्हटले आहे ?

(ज) राम जोशी ह्यांनी 'भला जन्म हा तुला लाभला' या लावणीतून मानवी जन्माची सार्थकता कशी पटवून दिलेली आहे ?

(झ) भाऊ पंचभाई यांनी वंचितांच्या वाट्याला आलेले दुःख 'डोळे' या कवितेतून कसे प्रकट केले आहे ?

4. पुढीलपैकी कोणत्याही **एकाच गटातील** प्रश्नांची उत्तरे लिहा : 20

गट 'क'

(त) इतिवृत्त लेखनाची पद्धती कशी असते ? सविस्तर लिहा.

(थ) बातमी लिहिताना कोणकोणत्या गोष्टी लक्षात घेणे आवश्यक असते ?

(द) भाषांतर म्हणजे काय ते सांगून भाषांतर विद्येचे स्वरूप लिहा.

(ध) मुलाखत घेणाऱ्या व्यक्तीने मुलाखत घेण्यापूर्वी कशी तयारी करावी ? सविस्तर लिहा.

**किंवा**

गट 'ख'

(प) इतिवृत्त लिहिताना कोणत्या गोष्टी लक्षात घेणे आवश्यक असते ?

(फ) 'स्वच्छता अभियान : अभिनव कार्यक्रम' याची बातमी तयार करा.

(ब) भाषांतर करताना त्याची पूर्वतयारी कशी करावी ?

(भ) मुलाखत-लेखनाच्या तंत्राचे स्वरूप लिहा.

5. खालील **सर्व** प्रश्नांची उत्तरे लिहा : 20

(1) दुर्गा भागवत ह्यांनी माघ महिन्याचे वर्णन कशाप्रकारे केलेले आहे ?

(2) तपस्वीच्या व्यक्तिमत्त्वातील विविध पैलू उलगडून दाखवा ?



(3) सुरेश भटांच्या 'स्मरण' या कवितेतून 'मृत्यू' संवेदना कशी प्रकटलेली आहे ?

(4) कुसुम अलाम ह्यांनी आपल्या कवितेतून न्याय व्यवस्थेच्या संदर्भात कोणता आशय प्रकट केला आहे ?

6. खालील वस्तुनिष्ठ प्रश्नांचे योग्य पर्याय निवडा : 20

(1) 'रुंभणेयाचा दृष्टांत' श्री चक्रधरस्वामींनी पैठण येथे कुणाला सांगितला :

(अ) महदाईसा

(ब) लघुबाईसा

(क) उमाईसा

(ड) आबाईसा

(2) वक्त्याचे मुख्य भांडवल कोणते ?

(अ) हावभाव

(ब) पोषाख

(क) आवाज

(ड) पाठांतर

(3) 'शिक्षक हा एक विशिष्ट पेशा न समजता, ते प्रत्येक सुबुद्धाचे पवित्र धर्मकर्तव्य आहे' हे विधान कुणाचे ?

(अ) डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन

(ब) स्वामी विवेकानंद

(क) डॉ. बाबासाहेब आंबेडकर

(ड) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज

(4) 'नवी पहाट उगवत आहे' या पाठाचे लेखक कोण आहेत ?

(अ) पु.भा. भावे

(ब) जयंत नारळीकर

(क) निर्मलकुमार फडकुले

(ड) आचार्य अत्रे

(5) 'लपलेला तारा' या पाठातील इलेक्ट्रॉनिक तंत्रज्ञ कोण होता ?

(अ) राजेश

(ब) ब्रजेश

(क) हर्शेल

(ड) रिचर्ड स्मिथ

(6) 'दीनांची माउली। आजि म्यां देखियेली' हा अभंग कोणी लिहिला ?

(अ) संत ज्ञानदेव

(ब) संत नामदेव

(क) संत तुकाराम

(ड) संत एकनाथ

(7) 'विराणी' ही कविता कुणी लिहिली ?

(अ) यशवंत

(ब) दत्त

(क) अनिल

(ड) माधव ज्युलियन



(8) 'ह्या नभाने ह्या भुईला दान द्यावे, आणि ह्या मातीतुनी चैतन्य गावे' ह्या काव्यपंक्ती कुणाच्या आहेत ?

(अ) विठ्ठल वाघ

(ब) ना.घ. देशपांडे

(क) बहिणाबाई चौधरी

(ड) ना.धों. महानोर

(9) 'भला जन्म हा तुला लाभला' ही लावणी कुणी लिहिली ?

(अ) होणाजी बाळा

(ब) राम जोशी

(क) परशूराम

(ड) सगणभाऊ

(10) 'सुसंगती सदा घडो, सुजनवाक्य कानीं पडो' हे काव्य कुणी लिहिले ?

(अ) मोरोपंत

(ब) रघुनाथ पंडीत

(क) दामोदर पंडीत

(ड) भास्करभट्ट बोरीकर

(11) सभेत संमत झालेल्या ठरावाची अधिवृत्त लेख नोंद घेण्याच्या प्रक्रियेला काय म्हणतात ?

(अ) बातमी लेखन

(ब) इतिवृत्त लेखन

(क) पत्रलेखन

(ड) मुलाखत लेखन

(12) अहवालात्मक इतिवृत्त कशा स्वरूपाचे असते ?

(अ) चिकित्सक आणि विश्लेषणात्मक

(ब) रचनात्मक

(क) वर्णनात्मक

(ड) प्रश्नात्मक

(13) अग्रलेख लिहिणे ही पत्रकाराची वार्षिक परीक्षा असते असे कोणी म्हटले ?

(अ) आचार्य अत्रे

(ब) लोकमान्य टिळक

(क) ग.त्र्यं माडखोलकर

(ड) गो.ग. आगरकर

(14) बातमीची यशस्वीता _______ अवलंबून असते.

(अ) लेखनावर

(ब) अक्षरांवर

(क) मथळ्यावर

(ड) घटनेवर

(15) एका भाषेतील मजकूर दुसऱ्या भाषेत आणण्याच्या प्रक्रियेला काय म्हणतात ?

(अ) रूपांतर

(ब) भाषांतर

(क) प्रकारांतर

(ड) स्थलांतर



(16) वैश्विक संस्कृतीपर्यंत पोहचविणारे समृद्ध भाषामाध्यम कोणते ?

(अ) मराठी

(ब) हिंदी

(क) इंग्रजी

(ड) उर्दू

(17) व्यक्तीच्या आयुष्यातील कोणताही महत्त्वपूर्ण व कुतूहलजनक प्रसंग जाणून घेण्यासाठी कोणत्या माध्यमाचा वापर करावा लागतो ?

(अ) वृत्तपत्र

(ब) आकाशवाणी

(क) चित्रवाणी

(ड) मुलाखत

(18) 'आध्यात्मिक म्हणजे धार्मिक हा गैरसमज' अशा आशयाची मुलाखत कुणी व कोणाची घेतली आहे ?

(अ) डॉ. भालचंद्र नेमाडे ह्यांनी डॉ. विलास खोले ह्यांची

(ब) डॉ. विलास खोले ह्यांनी डॉ. भालचंद्र नेमाडेंची

(क) जयवंत दळवी ह्यांनी ग.त्र्यं माडखोलकरांची

(ड) डॉ. अक्षयकुमार काळे ह्यांनी कवी ग्रेसांची

(19) ज्यात काहीतरी जगावेगळा, वैशिष्ट्यपूर्ण किंवा हृदयस्पर्शी किंवा विनोदी आशय असतो अशा प्रसंगाच्या बातमीला ______ देण्याची पद्धती आहे.

(अ) चौकटीत

(ब) कंसात

(क) जाड शब्दांत

(ड) वेगळ्या रंगात

(20) मराठीत कर्ता, कर्म, क्रियापद असा क्रम असतो तर इंग्रजीत कसा क्रम असतो ?

(अ) कर्ता, क्रियापद, कर्म

(ब) क्रियापद, कर्म, कर्ता

(क) कर्ता, कर्म, क्रियापद

(ड) कर्म, कर्ता, क्रियापद